महाराष्ट्र शासन

क्र. /राअप्रकें

दूरध्वनी क्र.

राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,
द्वारा, एम.एम.आर.डी.ए.अग्निशमन
स्थानक, वडाळा ट्रक टर्मिनस,
आर.टी.ओ.ऑफिस शेजारी,
वडाळा (पूर्व), मुंबई – ४०० ०३७.

दिनांक :

प्रति,

आयुक्त / मुख्याधिकारी,
सर्व महानगरपालिका / नगरपालिका,
इतर अग्निशमन सेवांचे प्रमुख.

विषय : राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई

प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र. (पुरस्कृत)
कालावधी : दि. ते

महोदय,

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.एफएफएस-१०८६/२५२५/सीआर-३५४/नवि-६, दि.३०.०३.२०३ नुसार राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८ येथे कार्यान्वित झाले आहे. या प्रशिक्षण केंद्रात अग्निशमन सेवेतील पुरस्कत कर्मचा-यांसाठी पुढीलप्रमाणे पाठयक्रम आयोजित करण्यांत आला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | पाठयक्रमाचे नांव | : | प्राथमिक अग्निशमल प्रशिक्षण पाठयक्रम क्र. (पुरस्कृत) |
| ०२. | कालावधी | : | दि. ते दि. |
| ०३. | जागांची संख्या | : | प्रत्येक पाठयक्रमासाठी २५ |
| ०४. | वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता व शारिरीक पात्रता | : | महानगरपालिका/नगरपरिषदा यांच्या अग्निशमन सेवेतील कर्मचा-यांसाठी वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता व शारिरीक पात्रता लागू होणार नाही. अग्निशमन सेवेतील ज्या कर्मचा-यांनी हा पाठयक्रम पूर्ण केला नाही त्यांनी या संधीचा फायदा घेऊन प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. तथापि वैद्यकीय दृष्टया तो कर्मचारी पात्र आहे किंवा कसे याबाबत सोबतच्या नमुन्यानुसार वैद्यकीय अधिका-यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत पाठविणे आवश्यक आहे.<br><br>शासकीय उपक्रमे व खाजगी कंपन्या यांच्या अग्निशमन सेवेतील कर्मचारी यांना इयत्ता १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच विहित शारिरीक पात्रता व वयोमर्यादेची अट पूर्ण करणे आवश्यक आहे.<br><br>प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी पुरावा म्हणून लेखी दस्तावेज म्हणजेच नेमणूकपत्र, ओळखपत्र इ. असणे आवश्यक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५. | ध्येय | : | राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपालिका तसेच सार्वजनिक संस्था, उपक्रमे यांच्या अग्निशमन सेवेतील कनिष्ठ कर्मचारी यांना अग्निशमन सेवेचे, नियंत्रणाचे मुलभूत प्रशिक्षण देणे, तसेच जिवित व मालमत्तेचे आगीपासून संरक्षण करण्याचे प्रशिक्षण देणे तसेच अग्निशमन विषयक उपकरणे हाताळणे, त्याची निगा ठेवणे. |
| ०६. | फायर कॉल ॲटेंड करणेबाबत | : | सर्व पुरस्कृत कर्मचा-यांना प्रशिक्षण कालावधीत केंद्रात आलेले फायर कॉल ॲटेंड करावे लागतील. तो त्याच्या प्रशिक्षणाचा भाग राहील. फायर कॉल ॲटेंड करतांना स्वतःच्या जिवाची काळजी घेणे ही त्याची जबाबदारी असेल. या कामामध्ये काही इजा/दुर्घटना झाल्यास प्रशिक्षणार्थी जबाबदार राहतील या अटीवरच प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल. |
| ०७. | प्रवेश अर्ज फी | : | प्रवेश अर्ज फी म्हणून मागासवर्गीय प्रशिक्षणार्थीने रु.४०/- व इतरांनी रु.६० चा डिमांड ड्राफट अर्जासोबत पाठवावा. |
| ०८. | प्रशिक्षण फी | : | १. महानगरपालिका/नगरपालिका, शासकीय कर्मचारी इ.यांचेसाठी दरमहा रु.२००/- प्रमाणे रु.६००/-<br><br>(ज्या महानगरपालिका/नगरपालिका या प्रशिक्षण केंद्रास वार्षिक अनुदान देत नाहीत, त्यांच्‌कडून दुप्पट दराने प्रशिक्षण शुल्क आकारण्यांत येईल).<br><br>२. शासकीय उपक्रमे यांचे कर्मचारी यांचेसाठी दरमहा रु.५००/- प्रमाणे रु.१,५००/-<br><br>३. खाजगी कंपन्यांचे कर्मचारी यांचेसाठी दरमहा रु,२,०००/- प्रमाणे रु,६,०००/- |
| ०९. | अनामत रक्कम | : | या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण साहित्य/उपकरणे/फर्निचर इ. हाताळण्यासाठी सर्व प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्येकी रु.१,०००/- अनामत रक्कम परतावा भरावी लागेल.<br><br>पुरस्कत उमेदवारांच्या आस्थापनेने त्यांच्या शिफारस केलेल्या उमेदवाराच्या अनामत रक्कमेबाबत त्या संस्थेच्या नावाची शासन पावती आवश्यक असल्यास ती कोणाच्या नावाने द्यावी हे स्पष्ट करावे. तसेच ही अनामत रक्कम परत करतांना याबाबतच्या देयकावर संबंधित आस्थापनेच्या अधिका-यांची आगाऊ मुद्रांक पोच पावती द्यावी लागेल. याची संबंधितांनी नोंद घ्यावी व त्यावेळी त्या देयकावर नमूद केल्याप्रमाणे धनादेश कोणाच्या नावानें काढावा लागेल याचा तपशिल शिफारस पत्रात स्पष्ट करावा. याबाबत आपणांकडून काही अभिप्राय प्राप्त न झाल्यास अनामत रक्कमेची पावती प्रशिक्षणार्थ्यांच्या नावानें देण्यांत येईल व परताव्याचा धनादेशही त्यांच्याच नावानें निर्गमित केले जातील. |

प्रवेश अर्ज फी, प्रशिक्षण फी व अनामत रक्कम मुंबई येथे देय असणा-या स्वतंत्र डिमांड ड्राफटसने अग्निशमन सल्लागार, महाराष्ट शासन,मुंबई "FIRE ADVISER TO THE GOVERNMENT OF MAHARASHTRA, MUMBAI" यांचे नांवे काढण्यांत यावेत. एकापेक्षा अधिक पुरस्कत उमेदवार असल्यास त्यांच्या फीचा स्वतंत्र डिमांड ड्राफट पाठवावा. तसेच अनामत रक्कमेचा देखील एकच दुसरा डिमांड ड्राफट पाठवावा.

०२. महानगरपालिका/नगरपालिका यांनी त्यांच्या पुरस्कृत उमेदवारांसोबत आवश्यक ती फी/अनामत रक्कमेचे डिमांड ड्राफट स्वतंत्र पाठवावेत. त्याचबरोबर त्यांच्या मेस, प्रशिक्षण साहित्यासाठी आवश्यक तो रोख अग्रीम येतेवेळी त्यांच्यासोबत द्यावा. ट्रेनिंग किट व अन्य येणा-या खर्चाबाबत सोबतच्या सूचनांचे कृपया अवलोकन करावे.

०३. म्हणून आपणांस विनंती करण्यांत येत आहे की, यापूर्वी शैक्षणिक, शारिरीक पात्रता इ कारणास्तव आपल्या ज्या कर्मचा-यांना पूर्वी या केंद्रातील प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रमात प्रवेश मिळाला नाही, अशा सर्व कर्मचा-यांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली असून त्यांना आपल्या सोयीनुसार या केंद्रात प्रशिक्षणासाठी पाठवावे. प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र. या केंद्रात वरील कालावधीत आयोजित केला आहे. तरी आपल्या अग्निशमन सेवेतील कर्मचा-यांना आपल्या शिफारस पत्रासह तसेच विहित नमून्यातील प्रवेश अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यालयात सोमवार दि. रोजी सकाळी ठिक १० वाजतां हजर राहण्यांस कळवावे.

आपला,

(सु. ना. वाघमारे)
अग्निशमन सल्लागार,
महाराष्ट्र शासन यांचे करीता.

सहपत्र : प्रवेश अर्ज व सूचनापत्र.

**प्रमाणित**
**छायाचित्र**

महाराष्ट्र शासन
राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र,
मुंबई - ४०० ०९८.

<u>प्र वे श अ र्ज</u>

०१. पाठयक्रमाचे नांव व कालावधी : प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.
दि. ते दि.

०२. शिफारस करणा-या प्राधिका-याचे नांव
(इंग्रजी):

(मराठी):

०३. संपूर्ण नांव (इंग्रजी):

(मराठी):

०४. अग्निशमन दलातील हुद्या : :

०५. जन्मतारीख :

०६. पत्रव्यवहाराचा पत्ता :

०७. दूरध्वनी क्रमांक :

०८. कायमचा पत्ता :

०९ आपण अनुसूचित जाती/जमातीचे उमेदवार आहात काय ? असल्यास जात व पोटजात याचा उल्लेख करावा व प्रमाणित प्रामाणपत्राची प्रत सोबत जोडावी. :

१०. शैक्षणिक पात्रता

| उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | संस्थचे नांव | श्रेणी | विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११. यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या तांत्रिक पाठयक्रमाचा तपशील

| उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | संस्थचे नांव | श्रेणी | विषय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(येथे अग्निशमन संस्था अथवा अगिनशमन प्रशिक्षण पूर्ण केल्ेल्या पाठयक्रमाचा अंतर्भात असावा)

१२. सेवेत धारण केलेल्या विविध दर्जा/पदांचा तपशिल
(संबंधित कार्यालयाने माहिती नमूद करावी)

| नेमणूक करणा-या कार्यालयाच्या प्रमुखांचे नांव व पत्ता | अर्जदाराने धारण केलेले पद/दर्जा | सेवाकाळ पासून | सेवाकाळ पर्यंत | पद सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(येथे सेवा प्रवेशापासून आतापर्यंत धारण केलेल्या सर्व पदांचा तपशिल द्यावा)

१३. आपण मोटारवाहन चालविण्याचा परवाना धारण करीत असल्यास त्याचा तपशील द्यावा. : अ) परवाना क्रमांक

ब) जड / हलके

१४. क्रीडा प्राविण्याबददल माहिती व कागदपत्रे :

१५. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रात यापूर्वी आपणांस कोणत्याही कारणास्तव पाठयक्रमात प्रवेश नाकारण्यांत आला आहे काय ? असल्यास तपशील द्यावा. :

१६. न्यायालयामार्फत आपणांस शिक्षा झाली आहे काय ? अथवा पोलिस ठाण्यावर आपणांविरुध्द गुन्हा प्रलंबित आहे काय ? असल्यास तपशील द्यावा. :

१७. आपल्या प्रशिक्षणाचा खर्च कोण करणार आहे ?

१८. प्रवेश अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे :

<u>उमेदवाराचे घोषणापत्र</u>

सदर पाठयक्रमासंबंधी पान क्र.०५ वरील सर्व नियम मी वाचले असून त्यास माझी मान्यता आहे व त्या अटी/ नियमानुसार मी वागण्याचे मी मान्य करतो.

पाठयक्रमाच्या कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना फायर कॉल ॲटेन्ड करावे लागतील त्यामुळे फायर कॉलवर गेल्यावर प्रशिक्षणार्थ्यांची् स्वतःची काळजी ही त्यांची जबाबदारी असेल यासह प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही प्रकारची इजा, जखम, नुकसान, विकलांगता अथवा मृत्यू झाल्यास राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई जबाबदार राहणार नाही.

प्रवेश अर्जात वर नमूद केलेली सर्व माहिती सत्य असल्याचे मी घोषित करतो.

मी सर्व प्रकारे वैद्यकीयदृष्टया स्वस्थ असून अशा कोणत्याही रोगापासून पिडीत नाही की, ज्यामुळे मी अतिशय कष्टकरी प्रशिक्षण घेऊ शकणार नाही.

ठिकाण :
दिनांक :

----------------------------------------
अर्जदाराची सही

---

<u>शिफारस करणा-या प्राधिका-याचे प्रमाणपत्र</u>

वरील घोषणापत्र ______________________________ यांनी माझ्या समक्ष सही केली आहे.

अर्जात नमूद केलेली माहिती कार्यालयीन दस्ताऐवजानुसार पडताळून पाहिली आहे. तसेच सदर माहिती सत्य आहे.

तसेच सदरचे अर्जदार नियमितरित्या नियुक्त कर्मचारी असून त्यांची नेमणूक रोजंदारी / हंगामी /कॉल्ट्रक्टवर नाहीत हे मी स्वतः पडताळून पाहिले आहे व प्रमाणित करतो आहे.

______________________________
शिफारस करणा-या प्राधिका-याचे नांव व
पदनांम शिक्का व सही

## वैद्यकीय स्वास्थ प्रमाणपत्र
(किमान M.B.B.S डॉक्टरचे)

(अ) पाठयक्रमाचे नांव व कालावधी : प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम क्र.
दि. ते दि.

(ब) शिफारस करणा-या प्राधिकरणाचे नांव :
महानगरपालिका/नगरपालिका इ.

(क) अर्जदाराची सही :

१. प्रमाणित करण्यांत येत आहे की, वर सही करणारे श्री. ---------------------------------------------
--- यांना तपासले असून ते सर्व प्रकारे प्रशिक्षणासाठी संसर्गजन्य रोग, क्षयरोग, हृदयरोग, फुफ्फुसरोग, दमा, अपेंडिक्स, किडनी, रक्तदाब यापासून त्यांना स्वास्थ्य आहे. तसेच त्यांची दृष्टी चांगली आहे.

२. मी आणखी प्रमाणित करतो की. वरील प्रशिक्षणार्थी शिडीचे व अन्य ड्रिल, साधनसामुग्री इ. हाताळण्याचा सराव व उंचीवरील विमोचन कार्य चष्म्याशिवाय करु शकतील. तसेच ते शारिरीकदृष्टया अग्निशमन प्रशिक्षणासाठी पात्र आहेत.

३. मी आणखी प्रमाणित करतो की. वरील प्रशिक्षणार्थी यांना चष्मा असला तरी ते शिडीचे व अन्य ड्रिल, साधनसामुग्री इ. हाताळण्याचा सराव व उंचीवरील विमोचन कार्य चष्म्याशिवाय करु शकतील. तसेच ते शारिरीकदृष्टया अग्निशमन प्रशिक्षणासाठी पात्र आहेत.

४. माझ्या मते त्यांचे अंदाजे वय --------- वर्षे आहे.

ठिकाण :

दिनांक :

सही :---------------------------------

पदनांम :-----------------------------

नोंदणी क्र. :-------------------------

सील :--------------------------

## राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई-९८.

## पाठयक्रमात प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रशिक्षणबाबत सूचना व नियम

०१. प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण केंद्रात राहणे सक्तीचे आहे. प्रशिक्षण केंद्राची अद्याप निवासी इमारत बांधण्यात आलेली नसल्यामुळे त्यांच्या राहण्याची तात्पुरती सोय प्रशिक्षण केंद्रात करण्यांत आलेली आहे. अनिवासी पाठयक्रम असल्यास प्रतिदिन रु.२/- सर्व्हिस चार्ज भरावा लागेल. पाठयक्रम निवासी असल्यास उमेदवारांना प्रतिदिन रु.५/- प्रमाणे निवासव्यवस्था व अन्य शुल्क पाठयक्रम सुरु होतेवेळीस भरावा लागेल. तसेच निवासस्थानाबाबत सर्व सोयी उपलब्ध नसल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना आपल्या सामानासोबत झोपण्यासाठी आवश्यक सतरंजी, चादर आणणे आवश्यक आहे.

०२. केंद्रातील भोजन व्यवस्थेचा अवलंब करणे सक्तीचे आहे. प्रशिक्षणार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था प्रशिक्षणार्थ्यांनी स्वयंपाकीच्या मदतीने सहकारी तत्वाने कार्यान्वित करावयाची आहे. त्यासाठी दरमहा रु.१,०००/- सरासरी भरावे लागतील.

०३. प्रशिक्षणार्थींनी दोन सेटस खाकी हाफ पॅन्टस, दोन सफेद हातवाले फुल गळयाचे बनियान तसेच ब्राऊन कॅनव्हास शुज, ब्राऊन सॉक्स, वेबबेल्ट, गमबूट, डांगरी, खाकी फुलपॅन्ट व हाफ शर्ट (पॉकेटस व शोल्डर स्ट्रीपसह) १ जोड, १ बेरेट कॅप इत्यादी सरावासाठी प्रशिक्षणार्थींनी आणणे आवश्यक आहे. फायरमन ॲक्स, हेल्मेट या दोन वस्तू केंद्रातर्फे प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीपुरते पुरविले जातील. ट्रेनिंग किटसाठी अंदाजे रु.१,५००/- खर्च अपेक्षित आहे.

०४. दर महिन्यास लेखी परिक्षा घेण्यांत येईल. उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० टक्के गुण आवश्यक आहेत. प्रशिक्षणाच्या अखेरीस लेखी/सरावाची (प्रॅक्टीकल) परिक्षा घेण्यांत येईल व उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० टक्के गुणांची आवश्यकता आहे. अंतिम लेखी परिक्षेच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रासाठी रु.५०/- शुल्क आकारले जातील. प्रमाणपत्रांवर गुणांनुसार श्रेणी दिल्या जातील.

०५. जे प्रशिक्षणार्थी सर्व परिक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण होतील त्यांना उत्तीर्ण झाल्याबाबत प्रमाणपत्र देण्यांत येईल. जे प्रशिक्षणार्थी परिक्षेत उत्तीर्ण होणार नाहीत, त्यांना पुढील सत्राच्या परिक्षेला पुन्हा बसावे लागेल. सर्व साधारण पुढील सत्राच्या परिक्षेसाठी उमेदवारांनी केंद्राच्या संपर्कात राहणे ही संबंधितांची जबाबदारी असेल. अनुत्तीर्ण झाल्यानंतर पुन्हा परिक्षेस बसण्याची संधी दोन वेळा आहे.

०६. प्रशिक्षण काळात प्रशिक्षणार्थींना केंद्राची स्वच्छता, परिरक्षण, बागकाम, साधनसामुग्री इ. चे परिरक्षण वगैरे सर्व प्रकारची कामे करावी लागतील व पाठयक्रमाच्या कालावधीत सर्व नियमांचे व शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे. केंद्रात संपूर्ण पाठयक्रम दरम्यान शिस्तीला जास्त प्राधान्य असल्यामुळे शिस्त वर्तनाबददल केंद्रातून केव्हाही काढून टाकण्यांत येईल.

०७ शासकीय सुटटयांच्या दिवशी प्रशिक्षण बंद राहील. विहित केल्याशिवाय रजा मिळणार नाही. परंतू प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून प्रशिक्षण कालावधीत सार्वजनिक सुटटीच्या दिवशी व इतर कोणत्याही दिवशी व वेळी आळीपाळीने सुरक्षेचे (सिक्युरिटीचे) किंवा अन्य या व्यतिरिक्त कर्तव्ये सुपूर्द करण्यांत येतील, त्याबददल कोणत्याही प्रकारचे वेतन/मोबदला/बदली रजा अनुज्ञेय नसेल तसेच त्यांना फायर कॉलवर जावे लागेल. पुर्वसूचनेशिवाय प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षणार्थी गैरहजर राहिल्यास त्याचे प्रशिक्षण खंडीत करण्यांत येईल. कार्यमुक्त केल्यास प्रशिक्षणार्थ्याच्या तो पर्यत दिलेल्या प्रशिक्षण कालावधीच्या अनुरुप, केंद्राच्या सूचनेनुसार/ नियमानुसार प्रशासन व अन्य खर्चासाठी रकमेतून कपात करण्यांत येईल. अशा प्रकारे कपात केली जाणारी रक्कम, प्रवेश शुल्क संबंधित प्रशिक्षणार्थ्यांकडून पुरस्कृत करणा-या संस्थेने वसूल करावी व अन्य प्रकारे अनुज्ञेय खाते निहाय कार्यवाही करावी.

* * * * *